# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300, 📠: 07172-255800 ✍: 7447744100 (PRO)


# पोलीस वार्तापत्र

## पो.स्टे.माजरी हददीत गोवंशाची अमानुष व अवैध वाहतुक करणाऱ्यांविरुध्द कारवाई

### एकुण ५३ नग (गौवंशीय) जनावरांची सुटका, २२ लक्ष ९५ हजार रु.चा माल जप्त

## पोलीस स्टेशन माजरी ची कामगिरी

दिनांक १२ मे, २०२६ रोजी पोलीस स्टेशन माजरी येथील सफौ रमेश तुराणकर व पोअं उमेश उईके हे सकाळी पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की,एक कंटेनर नागपूर कडुन येत असुन त्यत जनावरांची अवैध तस्करी होत आहे यावरुन माजरी पोलीसांनी तात्काळ वरोरा ते वणी हायवे रोडवर कुचना येथे नाकाबंदी करुन संशयीत ट्रक कंटेनर क्रमांक DD03-R-9840 ला थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालक याने वाहन थांबविता यु-टर्न घेवुन नागपूर कडे जाणाऱ्या दिशेने पळु लागल्याने त्याचा पाठलाग केला असता कंटेनर चालकाने त्याचा वाहन उभा करुन वाहन सोडुन पळुन गेला. सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये एकुण ५३ नग जनावरे गोवंश (बैल,गाय,गोरे) अमानुष रित्या भरुन कत्तलीकरीता नेत असतांना मिळुन आल्याने आरोपीविरुध्द विरुध्द पोस्टे माजरी येथे कलम ११(१)(ए)(ड)(ई)(एफ) (आय)(एल) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा १९६० व कलम , ५(अ),९ महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा १९७६ सुधारित २०१५ व कलम २८१, ४५, ३ (५) भारतीय न्याय संहिता व कलम १८४, २३९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात एकुण ५३ नग जनावरे (गोवंशीय) किं.अं.७,९५,०००/- रु. व एक ट्रक कंटेनर क्र.DD03-R-9840 किं.अं.१५,००,०००/- रु. असा एकुण किं.अं.२२,९५,०००/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक श्री ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा श्री संतोष बाकल यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री अमित पांडेय यांचे नेतृत्वात पोउपनि हरीदास चोपने, सफौ रमेश तुराणकर, पोअं ज्ञानेश कोटरंगे, रविंद्र किन्नाके, उमेश उईके, दिलीप मंडल सर्व पो.स्टे. माजरी यांनी केली आहे.